स्थायी समितीच्या **सोमवार दिनांक** 12–05–2014 रोजी **सकाळी** 11–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. नरेन्द्र उर्फ बाल्या गोंविदराव बोरकर | **अध्यक्ष** |
| 2. | सौ. पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या |
| 3. | सौ. भावना प्रशांत ढाकणे | सदस्या |
| 4. | श्री. हरिष सिताराम दिकोंडवार | सदस्य |
| 5. | सौ. सविता मनोज सांगोळे | सदस्या |
| 6. | श्री. दुनेश्वर सुर्यभानजी पेठे | सदस्य |
| 7. | सौ. विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| 8. | सौ. संगिता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 9. | श्रीमती इशरद नाहीद मो. जलील अंसारी | सदस्या |
| 10. | सौ. सिंधु रामा उईके | सदस्या |
| 11. | सौ. रविंदर कौर बावा | सदस्या |
| 12. | श्री. देवा प्रसाद उसरे | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | सौ. सुषमा संजय चौधरी | सदस्या |
| 2. | श्री. सागर दामोधर लोखंडे | सदस्य |
| 3. | श्री.सुरेश दामोधर तळवेकर | सदस्य |

## रिक्त सभासद संख्या ( 1 )

## उपस्थित अधिकारी

1) श्री. श्याम वर्धने, आयुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**<u>ठराव क्रमांक 03</u>** :— प्रभाग क्र. 62 (ब) भोलेनगर, भोलेबाबा नगर, श्रीराम नगर, शिवशक्तीनगर लवकुश नगर, धनगवळी नगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्यास्तव मे. एस.के. मेहता ॲन्ड कंपनी यांची प्राकलनीय दरापेक्षा 1.93 प्रतिशत ने अधिकची निविदा रू. 38,62,357/— (अक्षरी अडतीस लक्ष बासष्ठ हजार तीनशे सत्तावन) राशीच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 04</u>** :— प्रभाग क्र. 16 (ब) तिडके ले आऊट, बाबारासुमेर नगर, मारवाडी वाडी, तुलसी नगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्यास्तव मे. डि.सी. गुरूबक्षाणी यांची प्राकलनीय दरापेक्षा 2.65 प्रतिशत ने अधिकची निविदा रू. 64,87,991/— (अक्षरी चौसष्ठ लक्ष सत्यांशी हजार नऊशे ऐक्यानऊ) राशीच्या निविदेची रू. 30.00 लाखा पर्यंत कार्यादेशाकरीता मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन 'मे. डी.सी. गुरुबक्षाणी ऐवजी 'अमृता कन्स्ट्रक्शन' अशी कार्यालयाने सुचविलेल्या दुरुस्तीसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 05</u>** :— प्रभाग क्र. 3 अ संघर्षनगर येथे सिमेंट कॉक्रीटच्या रस्त्यांचे बांधकाम करण्याच्या कामास्तव तयार केलेल्या रू. 49,50,258/— (अक्षरी एकोणपन्नास लक्ष पन्नास हजार दोनशे अठ्ठावन्न रूपये) राशीच्या प्राकलनास जूने पद क्र. 681 व नविन पद क्र. A22001330802 अंतर्गत प्रशासविय मान्यता प्रदान करण्याचा व तरतूद मूक्त करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 06</u>** :— प्रभाग क्र. 64 (ब) अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करण्यास्तव मे. डि. सी. गुरूबक्षाणी, यांची प्राकलनीय दरापेक्षा 3.00 प्रतिशत ने अधिकची निविदा रू. 51,56,701/— (एकावन लक्ष छप्पन हजार सातशे एक) राशीच्या निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 07</u>** :— प्रभाग क्र. 62 (अ) महालक्ष्मीनगर येथील गजानन मंदीर ते श्री. फुल्लारे यांचे घरापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करण्यास्तव मे. डी. सी. गुरूबक्षाणी यांची प्राकलनीय दरापेक्षा 3.00 प्रतिशत ने अधिकची निविदा रू. 31,02,954/— (ऐकतीस लक्ष दोन हजार नऊशे चौपन फक्त) राशीच्या निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 08</u>** :— प्रभाग क्र. 29 मोमीनपुरा मोहम्मद अली रोड येथे प्रस्तावित लायब्ररीचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त 3 निविदांपैकी मे. क्रिऐटिव्ह कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरांपेक्षा 8.9 प्रतिशत ने कमी दरांची रू. 45,54,832/— (पंचेचाळीस लक्ष चौपण्ण हजार आठशे बत्तीस रूपये फक्त) रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 09</u>** :— प्र. क्र. 42 किल्ला येथे सोनिया गांधी झोपडपट्टी जवळ नागनदीची आर. सी भिंत बांधण्याच्या कामास्तव प्राप्त 9 निविदांपैकी मे. 786 कन्स्ट्रक्शन आणी डेकोरेशन यांची प्राकलनीय दरापेक्षा 1.11 प्रतिशने कमी दराची **रू. २७,१९,६७४/— (सत्ताविस लक्ष एकोणविस हजार साहशे चौऱ्याहत्तर रुपये फक्त)** रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 10</u>** :— प्रभाग क्र. 15 अ, विनोबाभावे नगर गल्ली नं. 7 व 18 मध्ये श्री.आटाचक्की, शितलामाता मंदिर व सतिश सहारे व फुलझेले यांचे घरासमोरील रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबतच्या कामाकरिता मे. एस.के.गुरुबक्षाणी यांचे मुळ प्राकलनीय दरापेक्षा 19.11 टक्के प्रतिशत ने अधिकची निविदा रु. 29,45,040/— (एकोणतीस लक्ष पंचेचाळीस हजार चाळीस फक्त )राशीच्या

सुधारीत प्राकलनास व निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 11</u> :— प्रभाग क्र. 30 टिमकी जागनाथ बुधवारी टोपरे विहिरीजवळ सामाजिक सभागृहाचे बांधकामास्तव प्राप्त निविदापैकी मे. रफिक अहमद रियाझ अहमद यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 6.87 टक्के अधिक दराची व नविन सी.एस.आर. दरानुसार प्राकलनीय दराची रु. 52,00,267/— रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 12</u> :— प्रभाग क्र. 32 अ—ब, अंतर्गत स्मॉल फॅक्टरी एरीया, रामपेठ व क्वेटा कॉलनी येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. पी.के.नगरारे कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा 2.30 टक्के अधिक दराची रु. 30,66,652/— रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न, तसेच हे काम फीक्स प्रायरीटी अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च रु.30.00 लक्ष पर्यंत सीमीत ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 13</u> :— प्रभाग क्र. 45—ब, वाठोडा येथे श्रीकृष्ण नगर, शेष नगर व शक्तीमातानगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. पी.के.नगरारे कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा 2.40 टक्के अधिक दराची रु. 42,15,922/— रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 14</u> :— प्रभाग क्र. 41 महाल येथील अमर शहीद सूनील सनेश्वर स्मृती उद्यान टाऊन हॉल महाल उद्यानात विविध विकास कामे करण्याचे रु. 63,92,111/— च्या प्राकलनास मंजूरी प्रदान करुन कामनिहाय निविदा मागविण्यास तसेच या कामाकरिता वास्तूविशारद मे. एन.वास्तू आर्कीटेक्ट, उदयदत्त गजभिये यांची म.न.पा. चे निर्धारित दरानुसार वास्तूठरावक सेवा घेण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 15</u> :— पांढराबोडी तलावाचे पर्यावरणीय दृष्टया संवर्धन करण्यासाठी राज्य शासनाने राज्य सरोवर संवर्धन योजने अंतर्गत रू. 33379992/— इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता दिली आहे. यामध्ये राज्य शासनाचा 70 टक्के हिस्सा असून 30 टक्के हिस्सा म.न.पा. ला वहन करावयाचा आहे.

पांढराबोडी तलावाचे संवर्धन करण्याकरीता रीतसर निविदा मागविल्या असता मे. तिरूपती कन्ट्रक्शन कंपनी गोंदीया यांची निम्नतम निविदा रू. 39.97 टक्के अधिक दराने प्राप्त झालेली आहे. तथापी कंत्राटदारानी वाटाघाटी नंतर निविदा राशी पेक्षा 35 टक्के अधिक दराने कामे करण्यास सहमती दर्शविली आहे. एकुण निम्नतम निविदा राशी रू. 41724990 एवढी असून निम्नतम निविदाधारक मे. तिरूपती कंन्ट्रक्शन कंपनी यांना मान्यता प्रदान करून रू. 41724990 च्या खर्चास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 16</u> :— नागपूर महानगरपालिकेचे विविध विभाग व झोन कार्यालयांमध्ये दैनंदिन कामाकरिता लागणाऱ्या संगणक कंझुमेबल्स व साहित्याच्या खरेदीसाठी दरकरार करण्याबाबत.

नागपूर महानगरपालिकेचे विविध विभाग व झोन कार्यालयांमध्ये दैनंदिन कामाकरिता लागणारे संगणकाचे कंझुमेबल्स व साहित्य खरेदी साठी एक वर्षाच्या कालावधीसाठी नविन दर करार करण्याकरिता ई—निविदा बोलविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 17</u> :– वर्ष 2014–2015 मध्ये नागपूर शहरात विविध ठिकाणी विंधन विहीरी खोदण्याच्या कामासंदर्भात खालील प्रस्तांवावर निर्णय घेण्याचा करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

1. विंधन विहीरीचे खोदकाम करण्याकरिता आवश्यक रु.150 लक्षच्या खर्चास प्रशासकीय मंजूरी प्रदान करणे व खर्चाची तरतुद वर्ष 2014–2015 चे अंदाजपत्रकात करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
2. नेटवर्क व नॉन नेटवर्क या दोन्ही भागात विंधन विहीरीचे खोदकाम करण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
3. विंधन विहीरीची यादी व अग्रक्रम ठरविण्याचे अधिकार जलप्रदाय समीतीस देण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन विंधन विहीरीची यादी व अग्रक्रम ठरविण्याचा अधिकार सभापती, स्थायी समितीस देण्यास स्थायी समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.
4. प्रशासकीय बाबी पूर्ण होईपर्यंत या कामाकरीता निविदा काढून दर व कंत्राटदार निश्चित करण्यास मंजूरी प्रदन करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 18</u> :– सविनय सादर करण्यात येते की, स्थायी समिती ठराव क्र. 355 दि. 10/02/2009 नुसार विभागातर्फे अग्निशमन सेवा शुल्क आकारण्यात येत होते.

आग प्रतिबंधक व जीव संरक्षण उपाययोजना अधिनियम 2006 चे कलम 16(01) नुसार अग्निशमनाचे कार्य पार पाडण्याच्या संबंधित गरजा भागविण्याकरीता विभागाचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीकोनातून 25 लक्षपेक्षा अधिक लोकसंख्या परंतु 50 लक्ष पेक्षा अधिक नसलेल्या महानगरपालिकेनी शुल्क आकारणी या अधिनियमाच्या तरतुदीनुसार विभागाने सुधारीत अग्निशमन सेवा शुल्क आकारण्याबाबतचा तक्ता (अ) तसेच विभागाकडून इतर कार्यासाठी आकारण्यात येणारे शुल्क तक्ता (ब) प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात आला. यास मा. तत्कालीन आयुक्त यांनी आचारसंहीताच्या काळात दि. 30.11.2011 प्रमाणे मंजुरी प्रदान केली आहे. त्यानुसार **दि. 30.11.2011 पासून विभागातर्फे सुधारीत दराने अग्निशमन सेवा शुल्क आकारण्यात येत आहे**.

उपरोक्त सुधारीत अग्निशमन सेवा शुल्क आकारणे ही बाब धोरणात्मक असून आग प्रतिबंधक व जीव संरक्षण उपाययोजना अधिनियम 2006 चे कलम 12(01) नुसार क, ख, (2) चे तरतुदीनुसार अग्निशमन सेवा शुल्क आकारण्यापुर्वी प्रारंभी कार्यपध्दती प्रमाणे सुधारित दराला विशेष बैठकीत ठराव संमत करून घेणे व तक्ता 'अ' मधील नमुद सुधारीत अग्निशमन सेवा शुल्काबाबतच्या ठरावास राज्य शासनाकडून मंजुरी घेणे अनिवार्य आहे.

करीता विभागाने सादर केलेला सुधारीत अग्निशमन सेवा शुल्क व इतर कार्यासाठी आकारण्यात येणारे शुल्क (तक्ता (अ) व (ब) प्रमाणे) दि. 30.11.2011 पासून आकारणी लागू करण्यास या विषयास मा. स्थायी समिती यांचे मंजूरीस्तव सादर केलेला प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

# तक्ता 'अ'

| Sr. No. | Types of Building | Schedule II, Section. 3(1) Municipal Corporation where population exceeds 25 lakhs but does not exceed 50 Lakhs | | Proposed revised Rate | |
|---|---|---|---|---|---|
| | | **Fee in Rs. Per Sq. mt.** | **Subject to Minimum of Rs.** | **Fee in Rs. Per Sq. mt.** | **Subject to Minimum of Rs.** |
| | Residential Building (A) | | | | |
| a) | Lodging or Rooming Houses (A-1) Less than 15 m in height | | | | |
| | i) Up to 15 rooms | **4.00** | **25,000.00** | **8.00** | **50,000.00** |
| | ii) More than 15 and up to 30 rooms | **6.00** | **30,000.00** | **12.00** | **60,000.00** |
| | iii) More than 30 room | **8.00** | **35,000.00** | **16.00** | **70,000.00** |
| b) | Apartment Houses (A-4) | | | | |
| 1 | From 15 m to 24 m in height | **4.00** | **25,000.00** | **12.00** | **75,000.00** |
| 2 | 24 m and above but not exceeding 35 m in height | **6.00** | **30,000.00** | **18.00** | **90,000.00** |
| 3 | Above 35 m but not exceeding 45 m in height | **8.00** | **50,000.00** | **24.00** | **1,50,000.00** |
| 4 | Above 45 m in height | **12.00** | **75,000.00** | **48.00** | **3,00,000.00** |
| c) | Hotels (A-5) | | | | |
| 1 | Less than 15 m in height | | | | |
| | i) Covered area not exceeding 300 m2 on each floor. | **4.00** | **25,000.00** | **8.00** | **50,000.00** |
| | ii) Covered area exceeding 300 m2 but not more 1000 m2 on each floor | **6.00** | **30,000.00** | **12.00** | **60,000.00** |
| | iii) Covered area exceeding 300 m2 but not more 1000 m2 on each floor | **8.00** | **40,000.00** | **16.00** | **80,000.00** |
| 2 | 15 m and above but not exceeding 30 m | **12.00** | **75,000.00** | **36.00** | **2,25,000.00** |
| 3 | Above 30 m in height | **15.00** | **1,00,000.00** | **45.00** | **3,00,000.00** |
| D | Hotels (Stared) (A-6) | | | | |
| 1 | Less than 15 m in height | | | | |
| | i) 3 starred Hotels | **14.00** | **90,000.00** | **28.00** | **1,80,000.00** |
| | ii) 5 starred Hotels | **18.00** | **1,25,000.00** | **36.00** | **2,50,000.00** |
| | iii) 5 starred Deluxe Hotels | **22.00** | **1,40,000.00** | **44.00** | **2,80,000.00** |
| 2 | 15 m and above but not exceeding 30 m m height | **28.00** | **2,50,000.00** | **84.00** | **7,50,000.00** |
| 3 | Above 30 m in height | **35.00** | **3,00,000.00** | **105.00** | **9,00,000.00** |
| | EDUCATIONAL BUILDING (B) | | | | |
| 1 | Less than 15 min height | | | | |
| | i) Ground plus one storey | **4.00** | **25,000.00** | **8.00** | **50,000.00** |
| | ii) Ground plus two storey | **6.00** | **30,000.00** | **12.00** | **60,000.00** |
| 2 | 15 m and above but not exceeding 30 m in height | **8.00** | **40,000.00** | **16.00** | **80,000.00** |
| | INSTITUTIONAL BUILDING | | | | |
| a) | Hospitals, Sanatoria and Nursing Homes (c-1) | | | | |
| 1 | Less than 15 m in height | | | | |
| | i) Up to ground plus one story with plot area less than 1000 m2 with no beds | **4.00** | **25,000.00** | **8.00** | **50,000.00** |
| | ii) Up to ground plus one story with plot area | **6.00** | **30,000.00** | **12.00** | **60,000.00** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | greater than 1000 m2 with beds. | | | | |
| | iii) Above two story, with no bead | **7.00** | **35,000.00** | **14.00** | **70,000.00** |
| | iv) Above two story, with bead | **8.00** | **40,000.00** | **16.00** | **80,000.00** |
| 2 | 15 m and above but not exceeding 24 m in height | **9.00** | **45,000.00** | **27.00** | **1,35,000.00** |
| 3 | Above 24 m and not exceeding 30 m in height | **12.00** | **60,000.00** | **36.00** | **1,80,000.00** |
| b | Custodial (c-2) and penal and plental (c-3) | | | | |
| 1 | Less than 10 m in height | | | | |
| | i) Up to 300 persons | **4.00** | **25,000.00** | **8.00** | **50,000.00** |
| | ii) More than 300 persons | **5.00** | **30,000.00** | **10.00** | **60,000.00** |
| 2 | 10 m and above but not exceeding 15 m in height | **7.00** | **35,000.00** | **14.00** | **70,000.00** |
| 3 | 15 m and above but not exceeding 24 m in height | **9.00** | **45,000.00** | **27.00** | **1,35,000.00** |
| 4 | 24 m and above but not exceeding 30 m in height | **12.00** | **60,000.00** | **36.00** | **1,80,000.00** |
| | ASSEMBLY BUILDING (D)<br>(D-1 TO D-5) | | | | |
| 1 | Less than 10 m in height | | | | |
| | i) Up to 300 persons | **4.00** | **25,000.00** | **8.00** | **50,000.00** |
| | ii) More than 300 persons | **6.00** | **30,000.00** | **12.00** | **60,000.00** |
| 2 | Above 10 m but not exceeding 15 m in height | **7.00** | **35,000.00** | **14.00** | **70,000.00** |
| 3 | Above 15 m but not exceeding 24 m in height | **9.00** | **50,000.00** | **27.00** | **1,50,000.00** |
| 4 | Above 24m but not exceeding 30 m in height | **12.00** | **75,000.00** | **36.00** | **1,80,000.00** |
| | BUSINESS BUILDING S (E) | | | | |
| 1 | Less than 10 m in heights | **4.00** | **30,000.00** | **8.00** | **60,000.00** |
| 2 | above 10 m but not exceeding 15 m in height | **6.00** | **40,000.00** | **12.00** | **80,000.00** |
| 3 | above 15 m but not exceeding 24 m in height | **8.00** | **75,000.00** | **24.00** | **2,25,000.00** |
| 4 | Above 24m height | **10.00** | **1,00,000.00** | **30.00** | **3,00,000.00** |
| | MERCANTILLE BUILDING (F) | | | | |
| i | F-1 and F-2 | | | | |
| 1 | Less than 15 m in heights | | | | |
| | i) Ground plus one story, with total covered area not exceeding 500 m2 | **4.00** | **25,000.00** | **8.00** | **50,000.00** |
| | ii) Ground plus one storey and covered area exceeding 500 m2 | **6.00** | **30,000.00** | **12.00** | **60,000.00** |
| | iii) More than ground plus one storey | **8.00** | **40,000.00** | **16.00** | **80,000.00** |
| 2 | Above 15 m but not exceeding 24 m in height | **9.00** | **75,000.00** | **27.00** | **1,50,000.00** |
| 3 | Above 24 m but not exceeding 30 m in height | **12.00** | **1,00,000.00** | **36.00** | **3,00,000.00** |
| b) | Underground shopping complex (F -3) | | | | |
| | INDUSTRIAL BUILDINGS (G) | | | | |
| a) | Up to 18 m in height | | | | |
| | i) Covered area up to 50 m2 | **4.00** | **25,000.00** | **8.00** | **50,000.00** |
| | ii) Covered area above 50 m2 and up to 100 m2 | **6.00** | **30,000.00** | **12.00** | **60,000.00** |
| | iii) Covered area above 100 m2 and up to 200 m2 | **8.00** | **50,000.00** | **16.00** | **1,00,000.00** |
| | iv) Covered area above 200 m2 and up to 400 m3 | **12.00** | **75,000.00** | **24.00** | **1,50,000.00** |
| | v) Covered area above 400 m2 | **15.00** | **1,25,000.00** | **30.00** | **2,50,000.00** |
| b) | Moderate Hazard (G – 2) | | | | |
| 1 | Up to 18 m in height | | | | |
| | i) Covered area up to 100 m2 | **4.00** | **25,000.00** | **8.00** | **50,000.00** |
| | ii) Covered area above 100 m2 and up to 250 m2 | **6.00** | **50,000.00** | **12.00** | **1,00,000.00** |
| | iii) Covered area above 250 m2 and up to 500 m2 | **8.00** | **75,000.00** | **16.00** | **1,50,000.00** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | iv) Covered area above 250 m2 | **12.00** | **1,25,000.00** | **24.00** | **2,50,000.00** |
| c) | High Hazard (G – 3) See Note (2) | | | | |
| 1) | (A) Up to 15 m in height | | | | |
| | i) Covered area up to 50 m2 | **4.00** | **30,000.00** | **8.00** | **60,000.00** |
| | ii) Covered area above 50 m2 and up to 150 m2 | **6.00** | **35,000.00** | **12.00** | **70,000.00** |
| | iii) Covered area above 150 m2 and up to 300 m2 | **8.00** | **50,000.00** | **16.00** | **1,00,000.00** |
| | iv) Covered area above 300 m2 and up to 500 m2 | **12.00** | **75,000.00** | **24.00** | **1,50,000.00** |
| | v) Covered area above 500 m2 | **15.00** | **1,50,000.00** | **30.00** | **3,00,000.00** |
| | (B) Cross Country Pipelines carrying hazardous Gases and Petroleum products. | **15.00 Per mtr.** | **1,50,000.00** | **30.00** | **3,00,000.00** |
| | STORAGE BUILDINGS (H) | | | | |
| 1 | Up to 15 m in height | | | | |
| | (i) Single Storey Building | **8.00** | **25,000.00** | **16.00** | **50,000.00** |
| | (ii) Ground plus one floor | **12.00** | **30,000.00** | **24.00** | **60,000.00** |
| 2 | Above ground plus one floor | **18.00** | **40,000.00** | **36.00** | **80,000.00** |
| | HAZARDOUS BUILDINGES (J) | | | | |
| I | Up to 15 m in height | | | | |
| | (i) Single Storey Building | **12.00** | **30,000.00** | **24.00** | **60,000.00** |
| | ii) More than one floor building but not exceeding 15 m | **18.00** | **40,000.00** | **36.00** | **80,000.00** |
| II | Annual Fee<br>As per Maharashtra act no. 13(1) & 14(3) to of Levied from date of Commencement of the Maharashtra from prevention and life safety measure Act. The Annual fee shall be calculated on minimum fees as per the provision of Act. | **---** | **---** | **1%** | **On minimum fees** |

## तक्ता ‘ब’

| | सेवेचा तपशील | प्रचलित दर | सुधारीत दर |
|---|---|---|---|
| १ | १) इमारत अग्निशमन सेवा शुल्क | म.न.पा. ठराव क्र. ३५५ दि. १०.०२.२००९ अनुसार | तक्ता ‘अ’ प्रमाणे |
| | २) इमारत नकाशा छाणनी फी (Scrutiny Fee) | — | अग्निशमन सेवा शुल्क (तक्ता ‘अ’) च्या दरावर २ टक्के |
| | ३) इमारत सुचनापत्राचे नुतनीकरण प्रमाणपत्र शुल्क | रू १०००/— | २०००/— |
| | ४) इमारत सुचनापत्राचे परीपुर्णता प्रमाणपत्र शुल्क | रू. १०००/— | २०००/— |
| | ५) इमारतीवर वार्षीक अग्निशमन सेवा शुल्क | अग्निशमन सेवा शुल्काच्या १ टक्के | अग्निशमन सेवा शुल्काच्या १ टक्के |
| | ६) व्यापार /व्यवसायासाठी फायर फीटनेस प्रमाणपत्र शुल्क | रू. २०००/— | २५००/— |
| | ७) तात्पुरते बांधकाम/ समारंभ/मंडप /इत्यादि साठी सुचनापत्र शुल्क | रू. २०००/— (धार्मिक कार्यक्रम नि:शुल्क) | २५००/— |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | **विहीर उपसा (खाजगी पाणी उपसा)** | रू. ४००/— पहिल्या ६ तासाकरीता त्यानंतर रू. १००/— प्रती तासाप्रमाणे | रू. ५००/— पहिल्या ६ तासाकरीता त्यानंतर रू. १००/— प्रती तासाप्रमाणे |
| ३ | **स्टॅण्डबाय डयुटी** | नि:शुल्क सेवा बंद रू. २०००/— पहिल्या ८ तासाकरीता | ४०००/— पहिल्या ८ तासाकरीता |
| | | त्यानंतर रू. ५००/— प्रती तास प्रमाणे | त्यानंतर रू. ५००/— प्रती तास प्रमाणे |
| ४ | **रूग्णवाहीका** | अ) शहराकरीता मोफत सेवा | शहराकरीता मोफत सेवा |
| | | ब) म.न.पा. हद्दीबाहेर रू. ७/— प्रती कि. मी. प्रमाणे | म.न.पा. हद्दीबाहेर रू. १०/— प्रती कि.मी. प्रमाणे |
| | | क) हॉल्टींग चार्ज रू. ५०/— प्रती तास | हॉल्टींग चार्ज रू. ५०/— प्रती तास |
| ५ | **शववाहक** | अ) शहराकरीता मोफत सेवा | शहराकरीता मोफत सेवा |
| | | ब) म.न.पा. हद्दीबाहेर रू. ७/— प्रती कि.मी. प्रमाणे | म.न.पा. हद्दीबाहेर रू. १०/— प्रती कि. मी. प्रमाणे |
| | | क) हॉल्टींग चार्ज रू. २५/— प्रती तास | हॉल्टींग चार्ज रू. ५०/— प्रती तास |
| ६ | **पाणी पुरवठा**<br>अ) ४५०० ते ५००० लिटर क्षमतेचे फायर टेन्डर | रू. ५००/— प्रती टॅकर | रू. ५००/— प्रती टॅकर |
| | ब) १०,००० लिटर क्षमतेचे फायर टेन्डर | रू. १२००/— प्रती टॅकर | रू. १२००/— प्रती टॅकर |
| | क) १०,००० लिटर क्षमतेचे वाटर टॅकंर बिना पंप | रू. ८०० प्रती टॅकर | रू. ८०० प्रती टॅकर |
| | ड) १०,००० क्षमतेचे बिना पंम्प व वेगळे पंम्प लावून पाणीपुरवठा | रू. १२००/— प्रती टॅकर | रू. १२००/— प्रती टॅकर |
| ७ | **हद्दीबाहेर अग्निशमन सेवा**<br>अ)वाटर टेन्डर/फायर टेन्डर ट्रिपमायलेज प्रति किमी. | रू. २०/— प्रति कि.मी. प्रमाणे | रू. ३०/— प्रति कि.मी. प्रमाणे |
| | ब) फायर टेन्डर/इमरजन्सी टेन्डर पाठविण्याचे शुल्क | काही नाही | २०००/— ८ तासा करीता |
| | क) वाहनावरील पंम्पाचे पंम्पीग चार्जेस | रू. ५००/— प्रति तास | रू. ५००/— प्रति तास |
| | इ) स्टॅण्डबाय डयुटी/हॉल्टींग चार्ज | रू. २५००/— प्रति दिवस | रू. ५००/— प्रति तास |
| ८ | **हॅड्रोलीक प्लॅटफार्म**<br>अ) स्टॅण्डबाय डयुटी | रू. ३०००/— प्रती ८ तास | रू. ३०००/— प्रती ८ तास |
| | ब) सिडीचा वापर केल्यास | रू. १०००/— अतिरिक्त चार्ज प्रती तास | रू. १०००/— अतिरिक्त चार्ज प्रती तास |

| | | | |
|---|---|---|---|
| | क) म.न.पा. हद्दीबाहेर | रू. २०/— प्रती कि.मी | रू. ३०/— प्रती. कि.मी |
| | ड) हॉल्टींग चार्ज | रू. ५००/— प्रती तास | रू. ५००/— प्रती तास |
| ९ | **फोम टेन्डर**<br>अ) म.न.पा. हद्दीबाहेर | रू. २०/— प्रति कि.मी. प्रमाणे | रू. ३०/— प्रति कि.मी. प्रमाणे |
| | ब) वाहनावर माउंटेड पंम्पीग चार्ज | रू. ३००/— प्रति तास | रू. ५००/— प्रति तास |
| | क) फोम लिक्वीड | आजच्या किंमतीच्या दुप्पट | खरेदी किंमतीच्या दुप्पट |
| | ड) हॉल्टींग चार्ज | रू. ४००/— प्रति तास | रू. ५००/— प्रति तास |
| १० | **पोर्टेबल पंम्प**<br>अ) खाजगी कामासाठी | रू ५००/— | रू ५००/— |
| | ब) बाहेर गावी फायर टेन्डर सोबत नेल्यास | रू. ५००/— प्रती तास | ब) रू. ५००/— प्रती तास |
| | क) सबमर्शीबल पंम्प (डिझेलवर चालणाऱ्या जनरेटर सहीत) | रू. ५००/— प्रती तास | रू. ५००/— प्रती तास |
| ११ | फायबर/रबर बोट | काहीच नाही | ५००/— प्रती तास |
| १२ | म.न.पा. हद्दी बाहेर उपरोक्त वाहनाद्वारे सेवा दिल्यावर एकुण बिलावर २० टक्के तुटफुट चार्ज आकारण्यात येईल | एकुण रक्कमेवर रू. २० टक्के | एकुण रक्कमेवर रू. २० टक्के |

<u>ठराव क्रमांक 19</u> :— नागपूर महानगरपालिका आरोग्य विभागा अंतर्गत सुरु असलेल्या डायलेसीस प्रकल्पाचे बळकटीकरणाकरिता हंसापुरी आयुवेर्दिक दवाखान्याचे माध्यमातून पीपीपी तत्वावर प्राप्त लॉयप्स क्लब यांचे E.O.I. मधील प्रकल्पात अंतभूत अटी शर्तीसह प्रशासकीय स्तरावर मंजुर दर सिरोनिगेटीव्ह रुग्णांकरीता रु.500/— (पाचशे) पैकी रु.250/— रुग्ण भुगतान करेल व रु.250 चा खर्च म.न.पा.वहन करेल.

सिरोपॉझिटीव्ह रुग्णांकरिता रु.600/— पैकी रु. 300/— रुग्ण भुगतान करेल व रु.300/— चा खर्च म.न.पा. वहन करेल. लॉयन्स क्लब या संस्थेला 5 वर्षाकरीता प्रकल्प चालविण्यास देण्याचा प्रश्न खालील प्रमुख अटी शर्तीसह विचारात घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

1. म.न.पा. विनामुल्य जागा उपलब्ध करुन देणार असल्याने प्रस्तावित डायलेसीस प्रकल्पाकरिता इमारतीचे भाडे लागणार नाही.
2. प्रकल्पाकरीता लागणरा विद्युत खर्च म.न.पा.व लायन्स क्लब यांनी सयुक्तपणे निम्मे—निम्मे (50—50 टक्के ) वहन करावे.
3. पाणी पुरवठा म.न.पा. तर्फे मोफत देण्यात यावा.
4. लॉयन्स क्लब यांना प्रति लाभार्थी रुग्णाप्रमाणे रु.2/— प्रमाणे प्रती दिवसाकरिता शुल्क आकारणे अनुज्ञेय राहील ( औषधी पुरवठा म.न.पा. करेल.)
5. प्रस्तावात अंतर्भुत अटी शतीचे उल्लंघन केल्यास लॉयन्स क्लब या संस्थेला रु.3000/— प्रतिमहा या प्रमाणे करारनाम्यात नमूद उर्वरित कालावधीकरिता दंड भरावा लागेल.

<u>ठराव क्रमांक 20</u> :– प्रभाग क्र. 8 ब मधील गिट्टीखदान चौक ते दिनशॉ फॅक्टरी पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदाकार मे. एस.के.गुरुबक्षानी यांची मुळ प्राकलनीय दरांपेक्षा 2.91 प्रतिशत ने अधिक दराची रु.48,61,809/– ( अठठेचाळीस लक्ष एकसठ हजार आठशे नऊ फक्त ) दराची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 21</u> :– वर्धा रोड सोनेगांव पोलीस स्टेशन ते मिहान मलनिःसारण केन्द्रापर्यंत लिफ्ट स्टेशन बांधून पंपींगद्वारे सांडपाणी वाहून नेणारी मलजलवाहीनी टाकण्याबाबत प्रश्न समितीने विचारात घेऊन,

नागपूर महानगरपालिका शहरातील नद्यांमधील प्रदुषण कमी करण्यास कटीबध्द आहे. नद्यांमधील प्रदुषण कमी व्हावे याकरीता मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी आदेश पारीत केलेले आहेत. तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाद्वारे सुध्दा निर्देश देण्यात आले आहेत. याकरीता पायाभूत सुविधा उभारणे गरजेचे आहे याचाच एक भाग म्हणून सोनेगांव पोलिस स्टेशन ते मिहान मलनिःसारण केन्द्रापर्यंत 500 मि.मी. व्यासाची 6 कि.मी. लांब मलजलवाहीनी टाकण्याचा प्रस्ताव आहे. याद्वारे मिहान येथील मलनिःसारण केन्द्रात 24 द.ल.लि. सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येईल.

या कामात खालील बाबींचा समावेश आहे.

1. सोनेगांव पोलिस स्टेशन जवळील नाल्यावर बंधार बांधण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
2. नाल्यापासून तर सिवेज संप करीता इतटेक व्यवस्थेची उभारणी करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
3. स्क्रीन चेंबर बांधण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
4. सम्प व पम्प हाउस चे बांधकाम करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
5. मलजल वाहून नेण्याकरीता पम्प हाउस ते मिहान एसटीपी पर्यंत 6 कि.मी. लांबीची पम्पींग मेनचे काम करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

उपरोक्त कामाचे ढोबळ प्राकलन रू. 11.13 कोटीचे असून या कामाचा देखभाल दुरूस्तीचे खर्च ( O & M for pumping of sewage from City to MIHAN) रू. 1.45 कोटी वर्ष इतका राहील. सर्व खर्च मनपास करावयाचा आहे.

या प्रकल्पाचा आराखडा मनपाच्या पॅनल वर असलेले पजिकृत तांत्रिक सल्लागार मेसर्स आर जगताप ॲन्ड असोसिएट, नागपूर यांच्या मार्फत तयार करण्यात आलेला असून या खालील बाबींचा समावेश राहील.

a) Preliminary survey.
b) Flow measurement.
c) Preparation of Detailed Project Report.
d) Preparation of Tender Documents for tendering process.
e) And Project Management Consultancy during execution of work.

तात्रिक सल्लागाराची फी ही निविदा प्रक्रिया निवड झालेले कंत्राटदार देतील.

याद्वारे मनपा, मिहान एसटीपी च्या मदतीने 24 द.ल.लि. सांडपाण्याबवर प्रक्रिया करणार असून त्यामुळे गोसीखुर्द धरणातील प्रदुषणाची मात्रा काही अंशी कमी करण्यास मदत होईल. या कामाचा खर्च पद क्र. 698 (A43902371915 ) अंतर्गत प्रस्तावित आहे.

सबब, मेसर्स आर जगताप ॲन्ड असोसिएट, नागपूर यांची तांत्रिक सल्लागार म्हणून नेमणूक करण्याचे तसेच ढोबळ प्राकलन रू. 11.13 कोटी, देखभाल दुरूस्ती 5 वर्षाकरीता रू. 7.25 कोटी असे एकूण रू. 18.38 कोटीचे प्राकलनास प्रशासकीय मंजूरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 22</u> :– नागपूर महानगरपालिकेच्या मालमत्ता कराअंतर्गत सन 2014–2015 आर्थिक वर्षात आकारावयाच्या मालमत्ता कराअंतर्गत विविध कर व त्यांचे दर निश्चित करण्याबाबत करसमीतीने घेतलेला निर्णय विचारात घेऊन हा ठराव धोरणात्मक मंजुरीकरीता सभागृहापुढे ठेवण्याचा प्रश्न विचारात घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन विषयास एकमताने मंजूरी प्रदान करुन विषय धोरणात्मक मंजूरी करीता म.न.पा. सभागृहाकडे पाठविण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

## महाराष्ट्र महानगर पालिका अधिनियमानुसार सन 2014–2015 मध्ये मालमत्ता करा अंतर्गत आकारावयाचे प्रस्तावित कर व त्यांचे दर

| | | सद्य दर | | 2013–2014 चे विभागाद्वारे प्रस्तावित दर | | कर आकारणी व कर संकलन समिती द्वारे प्रस्तावित | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **कराचा प्रकार** | **वार्षिक भाडे मुल्य** | **कराचा दर** | **वार्षिक भाडे मुल्य** | **कराचा दर** | **वार्षिक भाडे मुल्य** | **कराचा दर** |
| 1 | **सामान्य कर** | 1 ते 199 | 12 टक्के | 1 ते 2000 | 16 टक्के | 1 ते 2000 | 14 टक्के |
| | | 200 ते 1000 | 14 टक्के | 2001 ते 5000 | 20 टक्के | 2001 ते 5000 | 18 टक्के |
| | | 1001 ते 2000 | 16 टक्के | 5001 ते 20000 | 24 टक्के | 5001 ते 20000 | 22 टक्के |
| | | 2001 ते 5000 | 18 टक्के | 20001 ते 50000 | 28 टक्के | 20001 ते 50000 | 26 टक्के |
| | | 5001 ते 7000 | 20 टक्के | 50001 व त्याचे वर | 32 टक्के | 50001 व त्याचे वर | 30 टक्के |
| | | 7001 ते 10000 | 22 टक्के | | | | |
| | | 10001 ते 15000 | 23 टक्के | | | | |
| | | 15001 ते 20000 | 24 टक्के | | | | |
| | | 20001 ते 40000 | 27 टक्के | | | | |
| | | 40001 ते 70000 | 29 टक्के | | | | |
| | | 70001 ते 100000 | 30 टक्के | | | | |
| | | 100001 व त्यावर | 31 टक्के | | | | |
| 2 | **मलजल कर** | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 12 टक्के | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 12 टक्के | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 12 टक्के |
| 3 | **मलजल लाभ कर** | लागु नाही | | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 3 टक्के | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 2 टक्के |
| 4 | **आम पाणी कर** | 1 ते 199 | रू. 200 | 1 ते 2000 | 10 टक्के | 1 ते 2000 | 10 टक्के |
| | | 200 ते 1000 | रू. 400 | 2001 ते 5000 | 12 टक्के | 2001 ते 8000 | 12 टक्के |
| | | 1001 व त्याचे वर | वार्षिक भाडे मुल्याचा 40 टक्के कमीत | 5001 व त्याचे वर | 15 टक्के | 8001 व त्याचे वर | 15 टक्के |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | कमी रू. 800 | | | | |
| 5 | पाणी लाभ कर | लागु नाही | | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 3 टक्के | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 2 टक्के |
| 6 | अग्निशमन कर | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 1 टक्का | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 1 टक्का | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 1 टक्का |
| 7 | दिवाबत्ती कर | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 1 टक्का | लागु नाही | | लागु नाही | |
| 8 | रस्ते (पथ) कर | लागु नाही | | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 5 टक्के | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 2 टक्के |

## महाराष्ट्र महानगर पालिका अधिनियमानुसार
## मालमत्ता करा अंतर्गत प्रस्तावित म.न.पा. चे विविध कर व त्यांचे दराचे विवरण पत्र.
## राज्य शासनाचे कर

| | | सद्य दर | | 2013–2014 चे विभागाद्वारे प्रस्तावित दर | | कर आकारणी व कर संकलन समिती द्वारे प्रस्तावित | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | कराचा प्रकार | वार्षिक भाडे मुल्य | कराचा दर | वार्षिक भाडे मुल्य | कराचा दर | वार्षिक भाडे मुल्य | कराचा दर |
| 9 | शिक्षण कर (निवासी) | 1 ते 150 | 2 टक्के | 1 ते 150 | 2 टक्के | 1 ते 150 | 2 टक्के |
| | | 151 ते 300 | 3 टक्के | 151 ते 300 | 3 टक्के | 151 ते 300 | 3 टक्के |
| | | 301 ते 3000 | 4 टक्के | 301 ते 3000 | 4 टक्के | 301 ते 3000 | 4 टक्के |
| | | 3001 ते 6000 | 5 टक्के | 3001 ते 6000 | 5 टक्के | 3001 ते 6000 | 5 टक्के |
| | | 6001 व त्याचे वर | 6 टक्के | 6001 व त्याचे वर | 6 टक्के | 6001 व त्याचे वर | 6 टक्के |
| 10 | शिक्षण कर (अनिवासी) | 1 ते 150 | 4 टक्के | 1 ते 150 | 4 टक्के | 1 ते 150 | 4 टक्के |
| | | 151 ते 300 | 6 टक्के | 151 ते 300 | 6 टक्के | 151 ते 300 | 6 टक्के |
| | | 301 ते 3000 | 8 टक्के | 301 ते 3000 | 8 टक्के | 301 ते 3000 | 8 टक्के |
| | | 3001 ते 6000 | 10 टक्के | 3001 ते 6000 | 10 टक्के | 3001 ते 6000 | 10 टक्के |
| | | 6001 व त्याचे वर | 12 टक्के | 6001 व त्याचे वर | 12 टक्के | 6001 व त्याचे वर | 12 टक्के |
| 11 | रोजगार हमी कर (फक्त अनिवासी) | 1 ते 150 | 1 टक्का | 1 ते 150 | 1 टक्का | 1 ते 150 | 1 टक्का |
| | | 151 ते 300 | 1.5 टक्के | 151 ते 300 | 1.5 टक्के | 151 ते 300 | 1.5 टक्के |
| | | 301 ते 3000 | 2 टक्के | 301 ते 3000 | 2 टक्के | 301 ते 3000 | 2 टक्के |
| | | 3001 ते 6000 | 2.5 टक्के | 3001 ते 6000 | 2.5 टक्के | 3001 ते 6000 | 2.5 टक्के |
| | | 6001 व त्याचे वर | 3 टक्के | 6001 व त्याचे वर | 3 टक्के | 6001 व त्याचे वर | 3 टक्के |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 12 | **मोठया निवासी इमारतीवरील कर** | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 10 टक्के | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 10 टक्के | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 10 टक्के |

<u>ठराव क्रमांक 23</u> :– अ) महाराष्ट्र महानगरपालिका, अधिनियमाचे प्रकरण 8 कराधान नियम 2 (3) अनुसार नागपूर महानगरपालिका हद्दीतील सर्व मालमत्तेच्या (जमीनी व इमारती) मालकी हस्तांतरणाची नोटीस (अर्ज) स्वीकारण्यासाठी खालीलप्रमाणे सुधारित हस्तांतरण (नामांतरण) शुल्क निर्धारित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

| अ.क्र | तपशील | यापूर्वी 2003 मध्ये निश्चित केलेले व सद्यस्थितीत लागू असलेले हस्तांतरण शूल्क | प्रस्तावित हस्तांतरण (नामांतरण) शुल्क | कर आकारणी व कर संकलन समितीद्वारे प्रस्तावित |
|---|---|---|---|---|
| 1 | मालमत्तांचे हस्तांतरण (नामांतरण), मालकी हक्काच्या दस्तावेजात नमुद असलेल्या सर्व किंमतीवर, प्रत्येक दस्तावेजावर. | सरसकट रू. 400/–<br>प्रक्रिया शूल्क रू. 50/–<br>**एकूण रू. 450/–** | सरसकट रू. 3000/– | सरसकट रू. 1000/– |
| 2 | मालमत्तांचे हस्तांतरण (नामांतरण) वारसाहक्काने अथवा ज्या मालकीहक्कांच्या दस्तावेजात किंमत नमुद नाही अशा सर्व दस्तावेजांवर. | सरसकट रू. 50/– | सरसकट रू. 500/– | सरसकट रू. 500/– |

**ब)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण 8 कराधान नियम 1, (1) नुसार कोणत्याही मालमत्तेच्या हस्तांतरणचा संलेख झालेल्या दिनांकापासून तीन महिन्याचे आत, तसेच नियम 1 (2) अन्वये मय्यत, व्यक्तीच्या मृत्यूच्या दिनांकापासून एका वर्षाच्या आत हस्तांतरणाची नोटीस न दिल्यास नियम 19 (1) अंतर्गत रू. 50/– प्रति अर्ज दंड आकारण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.
**क)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण 9 कराधान नियम 14 (2) नुसार मालक अथवा भोगवटदाराव्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तिस कर आकारणी पुस्तिकेची तपासणी किंवा कर आकारणी पुस्तिकेची कोणत्याही भागाची माहिती घेण्याकरीता फी रू. 300/–प्रती मालमत्ता निर्धारित करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 24</u> :– नागपूर महानगरपालिका हद्दीतील ज्या मालमत्तांच्या वार्षीक कराची रक्कम रू. 500/– पेक्षा कमी असेल (आम पाणी कर सोडुन) अशा सर्व मालमत्तांवर कमीत कमी रू. 500/– मालमत्ता कराची आकारणी करण्याबाबत कर समितीने निर्णय विचारात घेऊन हा ठराव धोरणात्मक निर्णयास्तव सभागृहापुढे ठेवण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन धोरणात्मक निर्णयास्तव म.न.पा. सभागृहापुढे ठेवण्याच्या शिफारशीसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 25</u> :— अ) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 130 (1) (ब) **(पाणी पट्टी कोणत्या जागांवर बसवावयाचा)** या अंतर्गत पाण्याचे खाजगी नह किंवा सार्वजनिक नळ किंवा कारंजे यांच्याद्वारे किंवा कोणत्याही अन्यप्रकारे नगरपालिका जलव्यवस्था केंद्रातून पाणी पुरवठा करण्याची महानगरपालिकेने सोय केली आहे. अशी जाहिर नोटीस आयुक्तांनी ज्या भागात दिली असेल त्या भागात असलेल्या जागांवर पाणीपट्टी आकारण्याबाबत तरतूद आहे. या कलमाखाली त्याचे अधिकार किंवा कामे बजावण्याकरीता कार्यकारी अभियंता जलप्रदाय विभाग यांना अधिकार प्रत्यायोजन करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ब) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 131 (1) **(साफसफाई कर किंवा मलप्रवाह कर कोणत्या जागांच्या बाबतीत बसविण्यात येईल)** या अंतर्गत संडास, मुत्र्या, मलकुडया यातून मलमुत्र व दुषीत पदार्थ गोळा करणे, काढुन नेणे व त्यांची विल्हेवाट लावणे ही कामे महानगरपालिकेच्या अभिकरणामार्फत केली जातील अशी जाहीर नोटीस आयुक्तांनी शहराच्या ज्या भागात दिली असेल त्या भागातील मालमत्तांवर साफसफाई कर किंवा मलप्रवाह कर आकारण्याबाबत तरतूद आहे. या कलमाखालील त्याचे अधिकार किंवा कामे बजावण्याकरीता आरोग्य अधिकारी स्वास्थ विभाग, यांना अधिकार प्रत्यायोजन करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 26</u> :— नागपूर महानगरपालिका हद्दीतील मलमत्ता कर आकारण्याकरीता शिघ्र सिध्द गणक ( ready reckoned) दरावर आधारीत सुधारीत भाडेकर कार्यपध्दती बाबत कर व कर आकारणी विशेष समितीने सोबत जोडलेल्या मालमत्ता कर आकारणी वसूलीकरीता प्रस्तावित कार्यपध्दतीस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन परिशिष्ट 'अ' पान क्र. 7 वर परिशिष्ट (I) मालमत्तेच्या रहिवाशी प्रकाराकरीता वापरावयाचे भारांक, ii) मालमत्ता वापर वर्ग क, ड व इ चे भाडेकऱ्यांसाठी 2 ऐवजी 3 भारांकाची कार्यालयाने सुचविलेलया दुरुस्तीस मंजूरी प्रदान करण्यात येते. यासह धोरणात्मक निर्णयास्तव म.न.पा. सभागृहापुढे ठेवण्याच्या शिफारशीसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

मा. सभापती :— मेडीकल वेस्ट संदर्भात विभाग प्रमुखांनी माहिती दयावी.

आरोग्य उपसंचालक (डॉ. गणवीर) :— मा. सभापती महोदय, सन 2003 पासुन कॉन्ट्रॅक्टरला भांडेवाडी येथे जागा दिली आहे तेथे प्लॉट उभारला आहे एका वर्षाला तेथुन 24 लक्ष रुपयांची रिकव्हरी येत आहे.

मा. सभापती :— मेडीकल वेस्ट संदर्भातील पुर्ण डिटेल्स स्थायी समितीला त्वरीत दयावे तसेच कालच्या सभेमध्ये ठरल्याप्रमाणे मेट्रो प्रोजेक्टचे टेन्डर एका महिन्याच्या कालावधी मध्ये निकाली काढण्यात यावे.

नगरयंत्री :— मा. सभापती महोदय, जे.एन.एन.यु.आर.एम च्या प्रोजेक्टला महासभेची मंजुरी लागते.

मा. सभापती :— टेन्डरच्या प्रोसेस संदर्भातील पुर्ण डॉक्युमेंट तयार करावे.

अधिक्षक अभियंता :— मा. सभापती महोदय, या संदर्भात मान्यता मिळाली आहे. त्याचे ईओआय काढायचे आहे.

मा. सभापती :– प्रोजेक्ट संदर्भात प्रत्येक बुधवारी एक सभा घ्यावी तसेच मा.सुरेश भट सभागृहाचा मा. महापौरजी समवेत दौरा घ्यावा. आजपर्यत कुठले प्रोजेक्ट पुर्णत्वास आले आहे व कुठले प्रलंबित आहे या संदर्भात अधिक्षक अभियंता श्री. उराडे यांनी माहिती दयावी.

अधिक्षक अभियंता :– मा. सभापती महोदय, पी.डब्लु.डी च्या सिमेंट रोडचे कामे पुर्ण झाले आहे. तसेच बऱ्याचश्या रोडचे काम मोठया प्रमाणात सुरु झाले आहे व काही रोडचे वर्क ऑर्डर झाले आहे. नविन हॉटमिक्स प्लॉट भांडेवाडी येथे उभारावयाचे आहे. मिलींग मशीन कडुन प्रक्रीया करण्याचे काम सुरु आहे जेथे प्लास्टीक जमा होत आहे ते जवळपास 40 ते 50 टन प्लास्टीक आहे त्या प्लास्टीकला क्लीनिंग आणि शेडींग करुन वापरायचे आहे. जे.एन.एन.यु.आर.एम मध्ये एकुन 19 कामे सॅक्शन झाले आहे त्यापैकी 10 कामे पुर्ण झाले आहे 9 कामे 95 टक्के पुर्ण झाले आहे तसेच पेंच 4 टप्पा 1 चे काम 95 टक्के पुर्ण झाले आहे मे ते जुन ज्या शेवटच्या ऐंडींग पर्यत ते कामे पुर्ण होईल तसेच पेंच 4 टप्पा 2 चे 24 ई.एस.आर काढले होते. त्यातील 4 ई.एस.आर जागा न मिळाल्या मुळे राहिले आहे. पेंच 4 चे काम पुर्ण झाले आहे (वाचले)

मा. सभापती :– दानागंज व जरीपटका येथील काम त्वरीत पुर्ण करण्यात यावे.

अधिक्षक अभियंता :– मा. सभापती महोदय, जे.एन.एन.यु.आर.एम चे 30 टक्के शेअर आहे आणि ते रिफार्म करायचे आहे त्यामुळे 60 ते 70 कोटी रुपयांची राशी थांबलेली आहे ते पुर्ण करणे आवश्यक आहे सद्या प्रोजेक्टची स्थिती चांगली आहे 1 ते 2 महिन्यामध्ये प्रोजेक्ट पुर्णत्वास येईल.

मा. सभापती :– 6 महिन्याचे बजेट असल्यामुळे नागपूर शहरातील जास्तीत जास्त कामे करावयाची आहे त्याकरिता सर्व अधिकाऱ्यांनी चांगला प्रतिसाद दयावा व सर्व प्रोजेक्ट पुर्णत्वास न्यावे.

<u>ठराव क्रमांक 27</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर